पिंपरी चिंचवड महानगरपालिका
फ क्षेत्रीय कार्यालय, निगडी
फक्षेका/१/कावि/५५४ /२०१५
दिनांक - १३ / ८ /२०१५

**विषय - वाहनचालक पदाचे कामकाजा बाबत.**

**परिपत्रक,**

२/- फ क्षेत्रीय कार्यालयाचे अखत्यारीत असलेल्या प्रशासन, आरोग्य, स्थापत्य, विदयुत, आणि पाणीपुरवठा विभागाकडील वाहनचालक यांना कामाच्या वेळेपेक्षा अधिक वेळ कार्यालयात थांबून प्रत्येक महिन्यास अतिकालीन भत्ता देणेत येतो. मुळ कामाचे तासांपेक्षा अधिक वेळ कामकाजासाठी थांबावे लागले तर अशा जादा कामाच्या तासांचा अतिकालीनभत्ता देण्याबाबत प्रशासन विभागाचे धोरण निश्चित असतानाही काही वाहनचालक अतिकालीन भत्यासाठी विनाकारण कार्यालयीन वेळे पुर्वी कामावर येत आहेत तसेच कार्यालयीन वेळेनंतर वाहन जमा न करता कार्यालयात उशीरापर्यंत थांबून थम्ब इंप्रेशन करुन कार्यालय सोडतात ही बाब शिस्तीस धरुन नाही. यापुढे कार्यालयीन वेळे नंतर क्षेत्रीय अधिकारी यांनी सूचीत केले असेल किंवा महत्वाचे काम असेल तर क्षेत्रीय अधिकारी यांची पुर्व परवानगी घेऊन संबंधीत अधिका-यांनी वाहनचालकांना कामासाठी थांबवावे अन्यथा वाहन कार्यालयात जमा करावे अशा स्वरुपाची बाब भविष्यात निदर्शनास आल्यास संबंधीत वाहनचालक यांना अतिकालीन भत्ता देय राहणार नाही.याची नोंद घ्यावी.

**क्षेत्रीय अधिकारी**
**फ क्षेत्रीय कार्यालय**

**प्रत,**

**१.सर्व संबंधीत अधिकारी / वाहनचालक**
**२.प्रशासन/स्थापत्य/विदयुत/पाणीपुरवठा/आरोग्य/लेखा**
**फ क्षेत्रीय कार्यालय**